नियमीत फौजदारी खटला क्रमांकः ६११/२०१७
शासन विरुध्द नौशाद
निशाणी क्रमांक ०९

## अभियोग पक्षाचा साक्षीदार क्रमांक १ ची जबानी

माझे नावः– **मनोज गोमीन माहतो**
वयः– ४० वर्षे धंदाः– वेल्डींग
राः– प्रेमनगर, वरळी नाका, वरळी, मुंबई.

**सरतपासणी अभियोग पक्षाकरिता सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती भा. भ. भोसले**.

**१.** सदर घटना दिनांक ०७.०६.२०१७ रोजी बी. डी. डी. चाळ क्र. ३२, वरळी येथे सायंकाळी ५.१५ वाजताचे सुमारास घडली. त्याठिकाणी माझे दुकान आहे. मी काम पाहण्यासाठी बाहेर गेलो होतो. त्यावेळी आरोपी दुकानात आला व त्याठिकाणी कामगारांना म्हणू लागला की, त्याने दुकान घेतले आहे, दुकान खाली करा. १५ ते २० मिनिटांनी मी दुकानावर आलो. त्यावेळी मी आरोपीला विचारले की, ‘ तू इथे का आला’ तेव्हा तो म्हणाला की, ‘ दुकान मी घेतले आहे, दुकान खाली कर.’ त्यावर मी म्हणालो की, ‘ दुकान माझे आहे, मी दुकान खाली केल्यावर तू घे.’ त्यानंतर आरोपी मला शिवीगाळ करु लागला. त्यानंतर नौशाद याने माझ्या डोक्यात सळई मारली. पंकजने मला सोडविले. त्यानंतर लोक जमले व त्यांनी भांडण सोडविले. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी मला उपचार घेण्यास सांगितले. उपचार घेवून मी पुन्हा पोलीस ठाण्यात आलो.

**२.** मी आरोपीविरुध्द सदर गुन्हयासंबंधी पोलीसात तक्रार दिली. ती तक्रार आता मला दाखवण्यात आली, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे. ती **तक्रार निशाणी क्रमांक १०** वर आहे. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयासमक्ष हजर आहे. गुन्हयात वापरलेली सळई दाखवल्यास मी ओळखू शकतो.
**सरतपास पुर्ण...**

**उलट तपास आरोपीकरिता श्री. निकाळजे वकील साहेब यांच्याकडुन**

**३.** माझे दुकान जांभोरी मैदानाच्या कोप–यावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या मैदानात फिरायला येणारे लोक, मुले माझ्या दुकानासमोरुनच जातात.

**४.** **प्रश्नः**– ते पावसाळ्याचे दिवस होते ना ?
**उत्तरः**– त्यावेळी पाउस नव्हता.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पाउस पडत होता.

**६.** तक्रार देताना मी असे सांगितले होते की, त्यावेळी आरोपी दुकानात आला व त्याठिकाणी कामगारांना म्हणू लागला की, त्याने दुकान घेतले आहे, दुकान खाली करा. १५ ते २० मिनिटांनी मी दुकानावर आलो. त्यावेळी मी आरोपीला विचारले की, ‘ तू इथे का आला’ तेव्हा तो म्हणाला की, ‘ दुकान मी घेतले आहे, दुकान खाली कर.’ त्यावर मी म्हणालो की, ‘ दुकान माझे आहे, मी दुकान खाली केल्यावर तू घे.’ सदर बाबी तक्रारीत नमूद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला ते दुकान आरोपीच्या ओळखीनेच मिळाले होते.

**७.** हे मला माहित नाही की, दुकान मालक सुरेंद्र देसाई ते दुकान नौशादला देणार होता की नाही. हे मला माहित नाही की, त्याबाबत दोघांमध्ये चर्चा चालू होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सुरेंद्र देसाई ते दुकान नौशादला देणार होते असे मला कळाले होते.

**८.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकानाच्या बाहेर लोखंडी साहित्य पडलेले असते. साक्षीदार स्वतः सांगतो की, साहित्य दुकानाच्या आत असते. हे म्हणणे खरे नाही की, मी दुकानात काम करीत असताना घसरुन पडलो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या डोक्याला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा फायदा घेवून मी खोटी तक्रार दाखल केली. माझ्या कपडयांवर रक्त पडले होते. ते रक्ताने माखलेले कपडे पोलीसांनी मागितले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केली नाही. मी त्याच्याविरुध्द खोटी तक्रार केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझे दुकान घेवू नये म्हणून मी खोटी तक्रार दिली.

**उलट तपास पुर्ण...**

**फेर तपास काही नाही...**

दिनांकः २१/०९/२०२२ समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./-

(सुहास प्र. भोसले)

६२ वे महानगर दंडाधिकारी

दादर, मुंबई